सामना

गुरूवार २७ मार्च २०२५

# पर्यावरण संरक्षण ही सामूहिक जबाबदारी

## डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना पुरस्कार प्रदान



पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) – पर्यावरण संवर्धन, जतन आणि संरक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी असून, ते आपण कर्तव्यभावनेने केले पाहिजे, असे मत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ आणि रामनदीचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांनी व्यक्त केले.

'रामनदी पुनरुज्जीवन अभियान'ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली असून, यानिमित्त 'किर्लोस्कर वसुंधरा'तर्फे आयोजित पाचव्या ऑनलाइन 'किर्लोस्कर वसुंधरा रामनदी महोत्सवा'च्या समारोपप्रसंगी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पहिला रामनदी सेवक सन्मान प्रदान करण्यात आला. त्यावेळी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर बोलत होते. याप्रसंगी फॅसिलिटेटर आनंद चितळे, किर्लोस्कर वसुंधराचे क्युरेटर डॉ. गुरुदास नूलकर, वीरेंद्र चित्राव उपस्थित होते.

डॉ. श्रीनिवास वडगबाळकर म्हणाले, राम नदीच्या बाजूला असलेल्या नैसर्गिक स्रोतांचा शोध घेऊन त्याचे जतन आणि संवर्धन होणे आवश्यक आहे.

डॉ. माधव गाडगीळ म्हणाले की, नदीचे प्रदूषण होते तेव्हा ते केवळ जलप्रदूषण नसते. तर त्यातील वनस्पती, प्राणी यांच्यावरदेखील विपरित परिणाम होतात. त्या घटकांच्या होणाऱ्या प्रदूषणाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. अनिल गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

Service By: Vidisha Media Network- 9881736077